आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२१ मार्च २०२४ - गुरुवार

केंद्रीय निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीबाबत नवीन कायद्याला स्थगिती द्यायला सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. या कायद्याच्या आधारे ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंग संधू या दोन निवडणूक आयुक्तांची नेमणूक झाल्यानंतर त्याला आव्हान देणारी याचिका दाखल झाली होती. ती न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपांकर दत्त यांच्या खंडपीठाने फेटाळली. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर या कायद्याच्या अंमलबजावणीला स्थगिती देता येणार नाही असं न्यायालयाने स्पष्ट केलं.

**<><><><><>**

आगामी लोकसभा निवडणूक निःपक्षपाती आणि भयमुक्त वातावरणात व्हावी, असं आवाहन काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी देशातल्या संवैधानिक संस्थांना केलं आहे. नवी दिल्ली इथं आज ते पत्रकार परिषदेत बोलत होते. निवडणूक रोखे व्यवहाराबद्दल सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर तपशील उघड झाला, काँग्रेसला ११ कोटी रुपये रोख्यांद्वारे मिळाले आहेत. भाजपाने अद्याप काहीही कर भरलेला नाही. याबाबत यंत्रणा गप्प आहेत असं ते म्हणाले. मात्र दुसरीकडे कांग्रेसची खाती गोठवली आहेत, विविध यंत्रणांकडून विनाकारण नोटिसा जारी केल्या जात आहेत. एकूण काँग्रेसला निवडणूक लढवता येऊ नये याकरता विविध यंत्रणांचा वापर करुन त्रास दिला जात आहे असा आरोप त्यांनी केला. लोकशाहीचं रक्षण करण्याच्या दृष्टीनं निवडणूक समान पातळीवर लढण्याची संधी काँग्रेसला मिळावी असं आवाहन खरगे यांनी केलं. काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेता सोनिया गांधी आणि माजी अध्यक्ष राहुल गांधी या पत्रकार परिषदेला उपस्थित होते.

**<><><><><>**

महाराष्ट्रात नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यात अनेक ठिकाणी आज सकाळी भूकंपाचे धक्के जाणवले. सकाळी सहा वाजून नऊ मिनिटाच्या सुमारास आधी साडेचार रिक्टर तीव्रतेचा एक धक्का बसला. नंतर लगेचच ३ पूर्णांक ६ दशांश रिक्टर तीव्रतेचा दुसरा धक्का जाणवला. या भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यात आखाडा बाळापूर इथं १० मीटर खोल असून, हिंगोली, परभणी, नांदेड या तीनही जिल्ह्यातल्या गावांना भूकंपाचे धक्के जाणवले. मराठवाड्यात १९९३ च्या भूकंपानंतरचे हे सर्वांत जास्त तीव्रतेचे धक्के असल्याचं तज्ज्ञांनी सांगितलं. हिंगोलीचे जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी रहिवाशांना सांगितलं.

**होल्ड बाईट... जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर**

**<><><><><>**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षानं राजस्थान, हरियाणा आणि आंध्रप्रदेशमध्ये निवडणूक प्रभारी आणि सह-प्रभारी नियुक्त केले आहेत. राजस्थान साठी विनय सहस्रबुद्धे, विजया रहाटकर आणि प्रवेश वर्मा यांची, हरियाणासाठी सतीश पुनिया आणि सुरेंद्र सिंग नागर यांची आणि आंध्र प्रदेशसाठी अरुण सिंग आणि सिद्धार्थ नाथ सिंग यांची नियुक्ती केली आहे.

**<><><><><>**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज सकाळी मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची सुमारे दीड तास चर्चा झाली. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी त्यानंतर मनसेच्या प्रमुख नेते आणि पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली.

**<><><><><>**

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं व्हॉट्सॲपवर प्रसारित होणारे विकसित भारत अभियानाबद्दलचे संदेश त्वरित थांबवावेत, असे निर्देश निवडणूक आयोगानं दिले आहेत. लोकसभा निवडणूक घोषित झाल्यानंतरही नागरिकांच्या मोबाइल फोन वर हे संदेश प्रसारित होत असल्याच्या अनेक तक्रारी दाखल झाल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. दरम्यान, आदर्श आचारसंहिता लागू होण्यापूर्वी हे संदेश पाठवले होते, मात्र तंत्रज्ञान आणि नेटवर्कच्या मर्यादेमुळे ते उशिरा प्रसारित झाले असावेत, असं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

- रेल्वे तसंच विमानतळांसारख्या सार्वजनिक ठिकाणी अनधिकृतपणे लावलेली राजकीय भित्तिपत्रकं त्वरित हटवावी असे निर्देश निवडणूक आयोगानं केंद्रसरकार, सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना दिले आहेत. देशभरात अशा अनेक ठिकाणी अनधिकृत राजकीय जाहिराती अजूनही प्रदर्शित केल्या जात असल्याच्या तक्रारी आपल्याकडे विविध स्तरातून येत असल्याचं निवडणूक आयोगानं यासंदर्भात लिहीलेल्या पत्रात म्हटलं आहे.

**<><><><><>**

आज जागतिक वन दिन. वनांचा मानवी जीवनाशी असणारा संबंध, वनांवर अवलंबून असणारी प्राचीन औषध प्रणाली तसंच जैवविधता याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. यानिमित्तानं, जगभरात जंगल

निर्मिती, संगोपन आणि संरक्षणाचा संदेश देणारे अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जागतिक वन दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><><>

बीड जिल्ह्यात सध्या पाणी टंचाई स्थिती निर्माण झाली असून काही प्रकल्पात पाणीपातळी मृतसाठ्यात गेली आहे. बीड तालुक्यात २०, गेवराई तालुक्यात २१ तर शिरूर तालुक्यात २ अशा तीन तालुक्यांमधे एकूण ४३ गावात टँकर सुरु करायला उपविभागीय अधिकाऱ्यांनी मान्यता दिली आहे.

//<><><><><><>//